# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०२/१०/२०२६ (शुक्रवार )**

---

## बेला पोलीस स्टेशन हद्दीतील सराईत गुन्हेगारास नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

**पोलीस स्टेशन बेला हदद्दीतील सराईत आरोपी विशाल पांडुरंग जोगे, वय ३४ वर्ष, रा. दहेली, ता. नागपूर यास महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वये नागपुर जिल्हयातुन हद्दपार करण्यात आले आहे.**

**नमुद सराईत गुन्हेगार याचेवर शरीराविरूद्ध गुन्हे, महीला विरूध्द गुन्हे, चोरी करणे व अवैधरीत्या दारू बाळगुन दारूची विक्री करणे यासारखे गंभीर गुन्हे नोंद आहे.** नमुद आरोपीचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्याचे वर कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपी अशा प्रकारचे गुन्हेगारी कृत्य सुरू ठेवल्याने नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली होती तसेच आरोपीच्या गुन्हेगारी कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाल्यामुळे नमुद आरोपीचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव बेला पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपूर यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, नागपूर यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद गुन्हेगार **विशाल पांडुरंग जोगे, वय ३४ वर्ष, रा. दहेली, ता. नागपूर** यास सहा महिन्यांच्या कालावधीसाठी नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी हे नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**



हद्दपार आरोपी विशाल पांडुरंग जोगे

## अवैध हातभट्टी दारू निर्मिती व विक्री तसेच देशी दारू विक्री विरोधात पाचगाव पोलीसांची विशेष मोहीम
## चांपा, पाचगाव येथे कारवाई करत ३ गुन्हे नोंद
## ८७ हजारांचा मुद्देमाल जप्त

पोलीस स्टेशन पाचगाव :— **मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा , श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि श्री मयंक माधव, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग यांच्या मार्गदर्शनात तसेच पोलीस निरीक्षक श्री रविंद्र मानकर, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन पाचगाव यांच्या नेतृत्वात** दिनांक ०२/१०/२०२६ रोजी पाचगाव पोलीसांनी चांपा शिवारात मोहाफुल सडवा वापरून मोहाफुल हातभट्टीची दारू काढणाऱ्या तसेच चांपा आणि पाचगाव येथे अवैधरित्या देशी दारू विक्री करणाऱ्या आरोपींवर विरूध्द कारवाई करत ०३ **आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ०३ गुन्हे नोंदविले आहे.**

पाचगाव पोलीसांना गुप्त बातमीदाराकडुन हातभट्टी दारू निर्मितीची तसेच अवैध्यरित्या देशी दारू विक्रीची खात्रीशीर बातमी मिळाल्याने पोलीसांनी चांपा पारधीबेडा येथे कारवाई

करत घटनास्थळावरील रनिंग हातभट्टया नष्ट केल्या. तसेच आठवडी बाजार चांपा आणि पाचगाव येथे कारवाई करत अवैधरित्या देशी दारू विक्री करणाऱ्या आरोपींवर कारवाई केली.

**सदर कारवाईत एकुण २०० लिटर मोहाफुल सडवा, १०० लिटर मोहाफुल गावठी दारू, रनिंग भट्टी मध्ये उकळलेले १५० लिटर मोहाफुल रसायन सडवा प्लास्टीक आणि लोखंडी ड्रम ,जळाउ लाकुड, पाईप तसेच दारू गाळण्याचे इतर साहीत्य असा एकुण ८१,७५०/— रूपयांचा माल जप्त केला. चांपा आठवडी बाजार येथुन १८० मिली च्या ४५ निपा किंमती ३६००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पाचगाव येथे कारवाई करूप ९० मिली च्या ४३ निपा किंमती १७२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तिन्ही कारवाई मध्ये एकुण ८७,०७०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**सदर प्रकरणी आरोपी अमित किसनजी डहारे, वय ३० वर्षे, रा. पाचगाव ता उमरेड याच्यासह दोन महीला आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये प्रत्येकी ०१ असे एकुण ०३ गुन्हे नोंदविण्यात आले आहे. नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला आहे.**







## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्यावर
## एन.डी.पी.एस कायदयान्वये ०४ गुन्हे नोंद

नागपुर ग्रामीण जिल्हयात दिनांक ०१/१०/२०२६ रोजी पोलीस स्टेशन काटोल आणि मौदा येथे अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीविरूद्ध कलम २७ एन. डी. पी. एस कायदयान्वये ०४ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन काटोल** अंतर्गत आरोपी कशीप मोहम्मद शेख, वय ३० वर्ष, रा. सावरकर रोड गॅस गोडावुन काटोल हा फल्ली मार्केट काटोल येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन मौदा** अंतर्गत आरोपी १) अनुराग उल्हास निर्वान, वय २१ वर्ष, रा. स्नेहनगर मौदा २) सुजित चितरसन मंडल, वय ३८ वर्ष, रा. चक्रधर नगरी, मौदा ता. मौदा ३) संदिप मनोहर ठवसकर, वय ४५ वर्ष, रा. चक्रधर नगरी, मौदा ता. मौदा हे मौजा केसलापुर रोड वरील श्रीराम नगरी मौदा येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले.

## अवैध दारू निर्मिती, विक्री आणि वाहतूक, सेवन करणाऱ्यांवर ०८ गुन्हे दाखल, ५८,७००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त

**दिनांक ०१/१०/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक, वाहतूक तसेच दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण ०८ गुन्हे दाखल केले.**

**पोलीस स्टेशन मोहपा** येथे आरोपी नामे परशुराम नरसैय्या वोल्लरवार, वय ५८ वर्ष, रा. डोरली भींगारे, ता. काटोल याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी नामे १) मिथुन अदप बावने, वय ३५ वर्ष, रा पाटनसावंगी, ता. सावनेर, जि. नागपुर ग्रामिण २) नितेश मनोहर ईरखडे, वय ३५ वर्ष, पाटनसावंगी, ता. सावनेर, जि. नागपुर ग्रामिण यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे आरोपी १) परिमीत राजेंद्र डोंगरे, वय १९ वर्ष, २) हिमांशू उर्फ बिटया राजेंद्र खंडारे, वय २१ वर्ष, रा. आदर्श नगर, गल्ली नं ३, रानीदूर्गावती चौक, नागपूर यांचेवर ०१ गुन्हा नोंद, तसेच आरोपी १) साहील अशोक पवार,

वय २९ वर्ष, रा. पारधी बेडा गोंडखैरी, २) अक्षय ब्रिजमोहन तिवारी, वय ३० वर्ष, रा. वार्ड क्र ४, राजनगर कॉलनी फेटरी, ता.जि नागपूर यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन मौदा** येथे आरोपी नामे कमलेशकुमार मोतीलाल गुरजर, वय २३ वर्ष, रा. राजस्थानी ढाबा, मौदा याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कन्हान** येथे आरोपी नामे राजेश छोटेलाल सुरणे, वय ४२ वर्ष, रा. पाल नगर गोंडेगाव, ता. पारशिवनी, जि. नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद,

**नमुद कारवाईत एकुण १७५५० मिली देशी दारू, २० लिटर मोहाफुल दारू, ०१ मोसा असा एकुण ५८,७००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

**जनसंपर्क अधिकारी**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**